मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# कुदळवाडीतील आरक्षणे विकसित करण्याचा मार्ग मोकळा

## 932 एकरवरील चार हजार 796 अनधिकृत बांधकामे व पत्राशेड कारवाई करून हटवली

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली, कुदळवाडी, जाधववाडी परिसरातील अनधिकृत बांधकाम आणि पत्राशेडवर महापालिकेने कारवाई केल्याने प्रस्तावित प्रकल्प विकसित करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या भागातील आरक्षणे ताब्यात घेण्याची प्रक्रिया महापालिका राबविणार आहे. प्रस्तावित प्रकल्प विकसित झाल्यानंतर या भागातील रहिवाशांना नागरी सुविधा मिळणार आहेत.



चिखली, कुदळवाडी, जाधववाडी भागाचा पायाभूत विकास साधण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने सन १९९६-९७ च्या विकास आराखड्यामध्ये आरक्षणे निश्चित केली आहेत. परंतु, या भागात वाढत गेलेली अनधिकृत बांधकामे आणि पत्राशेड यामुळे आरक्षित जागा ताब्यात घेण्यास अडचणी आल्या. राजकीय दबाव आणि स्थानिकांचा विरोध झाल्याने आरक्षण विकसित करण्यात अडथळे आले. अनधिकृत बांधकामे व पत्राशेड धारकांना महापालिकेने अनेकवेळा नोटिसा दिल्या. तरीही, अनधिकृत बांधकामे काढली जात नव्हती.

> चिखली-कुदळवाडी-जाधववाडी भागातील आरक्षित जागा ताब्यात घेण्यासाठी सर्वेक्षण केले जाईल. जागा मालकांना हस्तांतरित विकास हक्क (टीडीआर) आणि चटई क्षेत्र निर्देशांकाचा (एफएसआय) मोबदला देऊन जागेचा आगाऊ ताबा घेण्यात येणार आहे. पुढील आठवड्यात शिबिर लावून, ही प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.
>
> **- प्रसाद गायकवाड, उपसंचालक, नगररचना विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

महापालिकेच्या अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निर्मुलन विभागाने चिखली, कुदळवाडी, जाधववाडी येथील ९३२ एकरवरील चार हजार ७९६ अनधिकृत बांधकामे व पत्राशेड कारवाई करून हटवली. त्यामुळे सन १९९६-९७ च्या महापालिका विकास आराखड्यातील पाण्याची टाकी, प्राथमिक शाळा, टाऊन हॉल, वाहनतळ यासह रस्त्याची आरक्षित जागा ताब्यात घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आरक्षित जागा ताब्यात आल्यानंतर विकास प्रकल्प राबविण्यास गती देण्यात येणार आहे. तसेच १२, १८, २४ आणि ३० मीटरचे नियोजित रस्ते विकसित करण्यात येणार आहे.

---

# महापालिकेचा दुबईमध्ये ‘वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड’ ने सन्मान

## दिडशे कलाकारांनी सांकेतिक भाषेसह तब्बल 16 भाषांमध्ये केले भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे गायन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने प्रजासत्ताक दिनी ‘आम्ही भारताचे लोक’ हा भारतीय संविधानाला महामानवंदना देण्यासाठी सांस्कृतिक विश्वविक्रमी कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात नेपाळ देशासह भारतातील विविध राज्यातून आलेल्या दिडशे कलाकारांनी सांकेतिक भाषेसह तब्बल १६ भाषांमध्ये भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे गायन करून इतिहास घडवला होता. या ऐतिहासिक सोहळ्याची नोंद ‘वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड’मध्ये झाली. या विश्वविक्रमाबद्दलचा प्रमाणपत्र प्रदान सोहळा दुबई येथे भारत सरकारचे केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत पार पडला.



भारत सरकारचे निवृत्त प्रधानसचिव डॉ. विश्वपती त्रिवेदी, संयुक्त अरब अमिराती चेंबर्स फेडरेशनचे महासचिव हमीद मोहम्मद बिन सालेम, दुबई वर्ल्ड ट्रेंड सेंटरचे कार्यकारी उपाध्यक्ष माहिर अब्दुलकरीम झुल्फर, वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अॅड. संतोष शुक्ला, मध्यपूर्वचे अध्यक्ष डॉ. जितेंद्र मतलानी, संयुक्त अरब अमिराती अल मख्तुम फाऊंडेशनचे विश्वस्त मिर्झा अल साहेग , संयुक्त अरब अमिराती वायुसेनेचे कार्यकारी संचालक मोहम्मद माझमी, डॉ. बहार अलहुदी, इब्राहिम याहूद आदींच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या वतीने अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर, उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड तसेच अश्वघोष आर्ट अँड कल्चरल फाऊंडेशनचे प्रमुख कबीर नाईकनवरे यांनी हा सन्मान स्वीकारला. सुमारे ४० देशांचे प्रतिनिधी या सोहळ्यास उपस्थित होते.

> भारतीय संविधानाचा प्रचार प्रसार करुन त्यातील मूल्यांना अभिप्रेत कृती प्रत्येकाने करणे हे आपले कर्तव्य आहे. महापालिकेने आयुक्त शेखर सिंह यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संविधानाचा विचार जनतेपर्यंत घेऊन जाण्यासाठी संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षपूर्तीनिमित्त आयोजित केलेल्या संविधानाला दिलेल्या महामानवंदनेच्या सांस्कृतिक कार्यक्रमाची नोंद वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये झाली. त्याबद्दल महापालिकेचा केलेला गौरव शहरासाठी भूषणावह आहे.
>
> **- चंद्रकांत इंदलकर, अतिरिक्त आयुक्त**

‘भारतीय संविधानाला यंदा ७५ वर्षे पूर्ण झाले आहेत. या अमृत महोत्सव वर्षपूर्तीबद्दल भारतीय संविधानाला सांगितिक महामानवंदना देऊन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने भारतीय संविधानाचा विचार नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कौतुकास्पद काम केले आहे. यानिमित्ताने पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय संविधानाचा प्रचार-प्रसार करण्यासाठी आदर्शवत ठरली आहे,’ असे गौरवाद्गार यावेळी केंद्रिय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी म्हटले.

# साहित्यनगरीकडे 'महादजी शिंदे' एक्स्प्रेस रवाना

## बाराशे साहित्यिक रेल्वेने दिल्ली दौऱ्यावर : मराठी भाषामंत्री उदय सामंत यांनी दाखवला हिरवा झेंडा

**पुणे | प्रतिनिधी**

झेंडूच्या फुलांनी सजलेली रेल्वेगाडी... ढोल-ताशांचा गजर... सोबतीला माय मराठीचा गजर अन् साहित्यिकांची मांदियाळी... स्वागतासाठी अंथरलेले रेड कार्पेट... आणि दिग्गज साहित्यिकांच्या सहवासात बुधवारी (दि. 19) महान सेनानी 'महादजी शिंदे' एक्स्प्रेस दिल्लीकडे साहित्य संमेलनासाठी रवाना झाली. सुमारे बाराशे साहित्यिक एकाच वेळी एकत्र घेऊन ही रेल्वेगाडी दिल्लीकडे रवाना झाली.

दरम्यान, 'जय हरी विठ्ठल', 'ज्ञानोबा तुकाराम', 'छत्रपती शिवाजी महाराज की जय', 'जय मराठी... मी मराठी'चा जयघोष आणि राष्ट्रगीत, महाराष्ट्रगीताचे सामूहिक गायन साहित्ययात्रींनी या वेळी केले.

यंदाचे अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलन दिल्ली येथे होत आहे. याकरिता पुण्यातून विशेष रेल्वे सोडण्यात आली आहे. ही गाडी बुधवारी दुपारी सव्वातीनच्या सुमारास पुणे रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक एकवरून सुटली. राज्याचे मराठी भाषामंत्री आणि संमेलनाचे स्वागताध्यक्ष उदय सामंत यांनी या गाडीला हिरवा झेंडा दाखविला.



त्यानंतर मंत्री उदय सामंत यांनी याच गाडीतून नगरपर्यंत प्रवास करत साहित्यिकांशी संवाद साधला. तत्पूर्वी, पुणे रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक एकवर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, ज्येष्ठ लेखिका डॉ. संगीता बर्वे, मराठी साहित्ययात्री संमेलनाचे अध्यक्ष शरद तांदळे, कार्यकारी अध्यक्ष वैभव वाघ, कार्याध्यक्ष शरद गोरे, कार्यवाह सचिन जामगे, मुख्य समन्वयक ॲड. अनीश पाडेकर, सोमनाथ चोथे, गणेश बेंद्रे, निमंत्रक अक्षय बिक्कड यांच्यासह रेल्वेचे अधिकारी आणि साहित्यिकवर्ग उपस्थित होता.

### फिरत्या चाकांवरील संमेलन

» सरहद पुणे आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळातर्फे दिल्ली येथे 98 वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. यानिमित्त मराठी साहित्ययात्री संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. पुणे ते दिल्ली प्रवासादरम्यान फिरत्या चाकांवर हे प्रवासी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

मुख्य संमेलनानिमित्त रेल्वेत होणारे हे मराठीतील पहिलेच तसेच जगातील सर्वांत मोठे व दीर्घ संमेलन आहे. पुण्यातून दिल्लीला जाणाऱ्या विशेष रेल्वेला महान सेनानी महादजी शिंदे यांचे नाव देण्यात आले असून, बोगींना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गड-किल्ल्यांची नावे देण्यात आली आहेत.

### साहित्ययात्री संमेलनाची ग्लोबल बुक ऑफ द एक्सलन्स इंग्लंडमध्ये नोंद

'ज्ञानपीठ' पुरस्काराने सन्मानित कवी केदारनाथ सिंह यांच्या 'केदारनाथ सिंह की पचास कविताएं' या कवितासंग्रहाच्या डॉ. संगीता बर्वे यांनी मराठीत केलेल्या 'सर्जनात्मक हस्तक्षेप' या अनुवादित पुस्तकाचे प्रकाशन उदय सामंत आणि डॉ. पी. डी. पाटील यांच्या हस्ते झाले. तसेच, पुणे ते दिल्ली प्रवासादरम्यान रेल्वेत होणाऱ्या मराठी साहित्ययात्री संमेलनाची ग्लोबल बुक ऑफ द एक्सलन्स इंग्लंडमध्ये नोंद करण्यात आली असून, ग्लोबल बुक ऑफ एक्सलन्स इंग्लंडचे उपाध्यक्ष डॉ. दीपक हरके यांनी पुणे रेल्वे स्थानकावर झालेल्या मराठी साहित्ययात्री संमेलनाच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमात उदय सामंत आणि संयोजकांना याविषयीचे प्रमाणपत्र प्रदान केले.

# स्वच्छता सर्वेक्षणात अव्वल येण्यासाठी अभिप्राय नोंदविण्याची नागरिकांना संधी

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा 'स्वच्छ सर्वेक्षण 2024' स्पर्धेत सहभाग

**पिंपरी | प्रतिनिधी**

केंद्र सरकारतर्फे दरवर्षी 'स्वच्छ सर्वेक्षण' ही स्पर्धा घेतली जाते. देशभरातील विविध शहरे या स्पर्धेमध्ये सहभागी होत असतात. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने देखील 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' स्पर्धेत सहभाग घेतला आहे. या स्पर्धेत 'नागरिकांचा अभिप्राय' यासाठी देखील गुण राखीव ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला या स्पर्धेत अव्वल क्रमांक मिळवण्यासाठी शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी आपला अभिप्राय नोंदवावा, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.



पिंपरी चिंचवड महानगरपलिका राबवत असलेल्या स्वच्छता सर्वेक्षण पाहणीसाठी केंद्र शासनातर्फे एक पथक येणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्याऱ्या शहरांसाठी काही निकष घालून दिले असून, त्या माध्यमातून याचे परीक्षण करून शहराला मानांकन दिले जाते. यामध्ये नागरिकांच्या अभिप्राय देखील महत्त्वाचा असून त्यासाठी राखीव गुण ठेवण्यात आले आहेत. त्यामुळेच पिंपरी चिंचवड शहराला अव्वल क्रमांक प्राप्त करण्यासाठी आधिकाधिक नागरिकांनी त्यांचे अभिप्राय ३१ मार्च २०२५ पर्यंत ऑनलाइन नोंदवणे आवश्यक आहे. तसेच स्वच्छ सर्वेक्षणासाठी समितीतर्फे पाहणी लवकरच सुरु होणार असून ही समिती सर्वेक्षण काळात नागरिकांशी संवाद साधणार आहे.

### ..असा नोंदवा अभिप्राय

» सर्वात प्रथम नागरिकांनी https://sbmurban.org/feedback या संकेतस्थळावर जावे.
»त्यानंतर स्वतःचा मोबाईल क्रमांक टाका आणि पसंतीची भाषा निवडा
»राज्य या पर्यायात 'महाराष्ट्र' आणि जिल्हा या पर्यायात 'पुणे' निवडा
»युएलबी पर्यायात 'पिंपरी चिंचवड' निवडा
»त्यानंतर तुमच्या समोर येणाऱ्या प्रश्नांचे योग्य उत्तर द्या
»तुमच्या मोबाईलवर येणारा ओटीपी टाकून अर्ज सबमिट करा

"'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' या स्पर्धेत पिंपरी चिंचवड शहराचा अव्वल क्रमांक यावा, यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका विविध उपक्रम राबवत आहे. या सर्वेक्षणामध्ये शहरातील स्थानिक नागरिकांचे अभिप्राय देखील महत्त्वाचे आहेत. त्यामुळे शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी त्यांचे अभिप्राय नोंदवणे गरजेचे असून नागरिकांनी आपले अभिप्राय नोंदवत आपले शहर स्वच्छतेच्या बाबतीत अव्वल आणण्यासाठी महापालिकेला सहकार्य करावे.

- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

# मोबाईल टॉवर कंपन्यांवर महापालिकेची कृपादृष्टी

## बड्या उद्योजकांच्या कंपन्यांना मालमत्ता करातून सूट, थकबाकीकडे करसंकलन विभागाचे दुर्लक्ष

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक मोक्याच्या ठिकाणी, निवासी आणि बिगरनिवासी मोठ्या इमारतींच्या गच्चीवर विविध कंपन्यांनी मोबाईल टॉवर उभारले आहेत. या मोबाईल टॉवर कंपन्याकडे कोट्यवधींचा मालमत्ता कर थकीत आहे. त्या थकबाकी वसुलीकडे महापालिकेचा कर आकारणी व कर संकलन विभाग वर्षानुवर्ष दुर्लक्ष करत आहे.

राज्य शासनाने मोबाईल टॉवर कंपन्याकडे सामान्य कराच्या १५ टक्के नूसार कर वसुल करण्याचे आदेश दिलेले आहेत. तरीही त्याकडे करसंकलन विभागाकडून कोणीच लक्ष देताना दिसत नाही. सामान्य नागरिकांना ५० हजार रुपयासाठी घराच्या जप्तीचे आदेश काढणा-या महानगरपालिकेकडून मोबाईल टॉवर्सच्या बड्या उद्योगपतीच्या कंपन्यावर कृपादृष्टी का दाखवत आहेत, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.



### टॉवर उभारताना नियमांचे उल्लंघन

» पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक ठिकाणी, टोलेजंग इमारतींच्या गच्चीवर मोबाईल टॉवर उभारले आहे. मात्र, शहरातील विविध इमारतीवर उभारण्यात आलेल्या एकुण ९२३ मोबाईल टॉवरपैकी ५३३ मोबाईल टॉवर अधिकृत आहेत. तर ३९० टॉवरधारक मोबाईल कंपन्यांनी महापालिकेची कोणत्याही प्रकारची परवानगी घेतलेली नाही. मोबाईल टॉवर उभारताना किरणोत्सर्ग स्तरही तपासावा लागतो. एका ठिकाणी किती टॉवर असावेत, निवासी इमारतीपासून ते किती दूर असावेत?, त्याचेही निकष असतात. परंतु कुणीच हे निकष पाळत नसल्याचे दिसून येत आहे. अनेक अवैध इमारतींवरही अनधिकृत टॉवर लावले गेले आहेत. याकडे महापालिकेचे दुर्लक्ष होत आहे.

### मिळकत कर वसुलीकडे दुर्लक्ष

» मोबाईल टॉवर उभारताना अनेक अनधिकृत इमारतींवरही अनधिकृत टॉवर असून, अशा प्रकारचे टॉवर अधिकृत होणार नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. काही मोठ्या हाउसिंग सोसायट्यांनीही अनधिकृतपणे टॉवर उभारले आहेत. दोन वर्षांपूर्वी असे अनधिकृत टॉवर महापालिकेच्या करसंकलन कार्यालयाकडून सील केले होते. मात्र, मोबाईल कंपन्यांनी न्यायालयातून याला स्थगिती आणली होती. त्यानंतर महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाकडून मोबाईल टॉवरच्या मिळकत कर वसुलीकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे.

“ शहरातील मोबाईल टॉवर कंपन्याच्या थकबाकीबाबत अनेक कंपन्याकडे न्यायालयात गेलेल्या आहेत. शासनाने सामान्य कराच्या १५ टक्के प्रमाणे मोबाईल टॉवर कडून मिळकतकर वसुली करण्याचे आदेश दिले आहेत. पण, त्यात शिक्षण कर, रोजगार हमी कर यासह अन्य कराची वसुली करायची का, नाही याबाबत शासनाकडे मार्गदर्शन मागितले आहे. तसेच काही कंपन्याच्या मिळकत वसुलीला स्थगितीही आहे. त्यामुळे मोबाईल टॉवरच्या मिळकत कर वसुलीकडे अद्याप लक्ष दिलेले नाही.

- अविनाश शिंदे, उपायुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या रेकॉर्डवर शहरात ९२३ मोबाइल टॉवर आहेत. त्यात ५३३ टॉवर अधिकृत तर ३९० टॉवर अनधिकृतपणे उभे आहेत. अनधिकृत टॉवरकडे महापालिकेने अद्याप कोणतीही कारवाई केलेली नाही. शहरात अनेक रहिवाशी व नागरी वस्तीत ग्राहकांना सेवा देण्याच्या नावाखाली नियम डावलून दाट लोकवस्ती मध्ये मोबाइल टॉवर उभे केलेले आहेत. मोबाइल टॉवरच्या धोकादायक रेडिएशनमुळे नागरिकांना गंभीर आजार होण्याची दाट शक्यता आहे. करोडो रुपयांचा नफा कमविणाऱ्या मोबाइल कंपन्या शहराच्या विविध भागात अनधिकृतपणे कोठेही व कसेही टॉवर उभारत आहेत. त्यावर महापालिकेकडून कोणतेही नियंत्रण नसल्याचे दिसून येत आहे.

महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडून केवळ एक-दोन मोबाईल टॉवर कंपन्यांनी स्वतः हून मालमत्ता कर भरलेला आहे. उर्वरित अधिकृत आणि अनधिकृत असलेल्या मोबाईल टॉवर्सच्या कंपन्यांनी मिळकत कर थकवला आहे. याबाबत मोबाईल कंपन्यांनी टॉवरची सुमारे ३० कोटींहून अधिक मिळकत कराची थकबाकी आहे.

# पिंपरी महापालिका उभारणार तीन बस आगार?; ‘पीएमपीएमएल’च्या पत्राविषयी पालिका सकारात्मक

## मंत्रालयातील नगरविकास विभागाने पीएमआरडीएच्या ताब्यात असलेल्या भोसरीत दोन ठिकाणी व रावेतमध्ये साडेपाच एकर जागा पीएमपीला वर्ग केल्या आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहराचा वाढता विस्तार पाहता सध्याची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अपुरी पडत आहे. ती वाढवण्यासाठी पीएमपी प्रशासनाकडून बससेवेबरोबरच अतिरिक्त जागेची मागणी होत होती. त्यानुसार, पुणे महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) ने तीन ठिकाणी साडेपाच एकर जागा महामंडळाला (पीएमपीएल) दिली; मात्र या जागांवर खर्च कोण करणार, या कारणास्तव ताब्यातील साडेपाच एकर जागा पडून आहे. त्यासाठी पीएमपीने स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून पिंपरी-चिंचवड पालिकेला बस आगार उभारण्याबाबतचे पत्र पाठवले. यावर सकारात्मक चर्चा झाली असून, निधीची उपलब्धता अन् आयुक्तांच्या मंजुरीची वाट पहावी लागणार आहे. दरम्यान, या तीन जागा विकसित झाल्यास शहरातील सार्वजनिक व्यवस्था सुधारेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.




### बस पार्किंग, संचलन आणि ई बसचे नियोजन

» या ठिकाणी सीएनजी आणि इलेक्ट्रिक बससाठी आगार होण्याची शक्यता आहे. मोशी येथील आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्राजवळील जागा, भोसरी येथील मध्यवर्ती सुविधा केंद्राजवळ तसेच रावेत येथील जागेवर टर्मिनल आणि बस पार्किंग करण्याचे नियोजन आहे. तर, ई-बसच्या दृष्टीने भोसरी मध्यवर्ती सुविधा केंद्राची जागा महत्त्वाची असून, त्या ठिकाणी ई-डेपो केला जाणार आहे. या शेजारीच महावितरण सबस्टेशन आहे. त्यामुळे ई-बसला त्याचा फायदा होणार आहे.

### चऱ्होली, हिंजवडी ई- डेपो प्रतीक्षेत

» पुणे महानगर परिवहन महामंडळाचे (पीएमपी) हिंजवडी फेज-2 आणि चऱ्होली हे दोन्ही इलेक्ट्रिक डेपो चार्जिंग पॉईंटसह बांधून तयार आहेत. मात्र, ते अद्याप सुरू झाले नाहीत. हिंजवडी आणि उपनगरातील वाढती सार्वजनिक वाहतूक व्यवस्था लक्षात घेता हे आगार लवकर सुरू होणे अपेक्षित आहे.

पुणे, पिंपरी चिंचवड आणि पीएमआरडीए या तिन्ही हद्दीत 1 हजार 700 बसेसमार्फत सेवा दिली जाते. मात्र तुलनेने पिंपरी-चिंचवड शहरामध्ये बसेसची संख्या कमी आहे. सध्याच्या तीन आगारांमधून अवघ्या 400 बसेस रस्त्यावर धावतात. त्यामुळे शहरातील वाढत जाणारी उपनगरे आणि मध्यवर्ती भागात पुरेशी बससेवा देता येत नाही. दरम्यान, आगामी काळात पीएमपीच्या ताफ्यामध्ये नव्याने सीएनजी आणि इलेक्ट्रिक बसेस दाखल होणार आहेत. त्यामुळे पार्किंग, नियोजन आणि संचलन या सर्वांसाठी पिंपरी-चिंचवड शहरात जागा उपलब्ध नाहीत. त्यामुळे पीएमपी प्रशासनाने तीन ठिकाणी जागा देण्याची मागणी पीएमआरडीए प्रशासनाकडे केली होती. त्यावर मंत्रालयातील नगरविकास विभागाने पीएमआरडीएच्या ताब्यात असलेल्या भोसरीत दोन ठिकाणी व रावेतमध्ये साडेपाच एकर जागा पीएमपीला वर्ग केल्या आहेत.


# उजनीच्या पाण्यावरून पुणे विरुद्ध सोलापूर रणकंद पेटणार

## 1600 क्यूसेकने विसर्ग : पिण्याच्या नावाखाली पाणी सोडल्याचा आरोप

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे, सोलापूर व अहिल्यानगर या तीन जिल्ह्यांना "वरदायिनी "ठरलेले उजनी धरणातून भीमा नदी पात्रात पिण्यासाठी पाणी सोडण्यात आले आहे. सोलापूर महानगरपालिका, पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा येथील नगरपालिका, तसेच ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांसाठी 1600 क्यूसेक पाण्याचा विसर्ग भीमा नदी पात्रात सोडण्यात आला आहे; मात्र पिण्याच्या पाण्याच्या नावाखाली उजनी धरणातून पाणी सोडले जात असल्याचा आरोप इंदापूर तालुक्यातील उजनीच्या पाणलोट लगतच्या भूमिहीन शेतकऱ्यांनी केला आहे.

उजनीच्या पाण्यावरून पुन्हा एकदा पुणे जिल्हा विरुद्ध सोलापूर जिल्हा असा रणकंद पेटण्याची शक्यता आहे. उजनी धरणाची निर्मिती जरी सोलापूर जिल्ह्यात असली तरी, संपूर्ण पाणलोट क्षेत्र मात्र इंदापूर तालुक्यात आहे. त्यामुळे पिण्याच्या नावाखाली उजनी धरणातून पाणी सोडून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचा प्रताप सुरु असल्याची प्रतिक्रिया उजनी धरणग्रस्त बचाव कृती समितीचे अध्यक्ष अरविंद जगताप यांनी दिली. उजनीतील पाणीसाठा झपाट्याने कमी होऊ लागला आहे. त्यात उन्हाळा अधिकच कडक होत असल्याने इंदापूर तालुक्यातील उजनीतलगतचा शेतकरी हवालदिल झाला आहे.



### लोकप्रतिनिधींनी आवाज उठवण्याची गरज

» उजनी धरणाच्या पाण्यावरती ज्या तालुक्यांची शेती अवलंबून आहे, अशा दौंड, इंदापूर, माढा, करमाळा, कर्जत, श्रीगोंदा या तालुक्यातील लोकप्रतिनिधींनी आवाज उठवण्याची गरज आहे; मात्र लोकप्रतिनिधी जाणीवपूर्वक याकडे दुर्लक्ष करत आहेत . उन्हाची तीव्रता वाढत असल्याने पाणी पातळीत घट होणार हे निश्चित आहे; परंतु सतत पिण्याच्या नावाखाली सोलापूरला भीमा नदीपात्रातून पाणी सोडले जात असल्याने नक्की समजायचे काय, हा प्रश्न आमच्यासमोर निर्माण झाल्याच्या प्रतिक्रिया अनेकांनी दिल्या.

याबाबत आम्ही उजनी धरणग्रस्त इंदापूर तालुका बचाव कृती समितीचे अध्यक्ष अरविंद जगताप यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी सांगितले की, कुठल्याही धरणातून पिण्याच्या नावाखाली पाणी सोडले जात नाही. फक्त उजनी धरणातून हे पाणी सोडले जात आहे. पिण्यासाठी पाणी देण्यास आमची हरकत नाही; परंतु सोलापूर महानगरपालिका, सांगोला, पंढरपूर, मंगळवेढा या नगरपालिकांना समांतर जलवाहिनी टाकून पाणी देण्यात यावी, अशी मागणी केली होती; मात्र ती जाणीवपूर्वक पूर्ण केली जात नाही .

> 30 जूनपर्यंतचा डेड वॉटर स्टॉक सोडून वरील पाणलोट क्षेत्रातील पाण्याचे समनियोजन झाले पाहिजे, अन्यथा उजनी काठावरील शेतकऱ्यांना हक्काच्या पाण्यापासून वंचित राहावे लागणार आहे . तरी लोकप्रतिनिधींनी केवळ मतदान मिळवण्यापुरते काम न करता उजनीच्या पाण्याचे ठोस नियोजन करावे.
> - अरविंद जगताप, अध्यक्ष उजनी धरणग्रस्त बचाव कृती समिती

उजनी धरणाच्या निर्मिती वेळी आम्ही आमच्या जमिनी दिल्या, भूमिहीन झालो. काही जमिनीवरती आमचा उदरनिर्वाह चालू आहे. असे असताना आमच्या हक्काचे पाणी राखीव ठेवले जात नाही. तसेच पाण्याचे योग्य नियोजन करण्याची गरज आहे. सन 2017च्या लवादाच्या निर्णयानुसार दिलेल्या निर्णयाला शासन सुद्धा केराची टोपली दाखवत असल्याचा आरोप जगताप यांनी केला.

ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांसाठी 1600 क्यूसेक पाण्याचा विसर्ग भीमा नदी पात्रात सोडण्यात आला आहे; मात्र पिण्याच्या पाण्याच्या नावाखाली उजनी धरणातून पाणी सोडले जात असल्याचा आरोप इंदापूर तालुक्यातील उजनीच्या पाणलोट लगतच्या भूमिहीन शेतकऱ्यांनी केला आहे उजनी धरणग्रस्त बचाव कृती समितीचे अध्यक्ष अरविंद जगताप यांनी दिली. उजनीतील पाणीसाठा झपाट्याने कमी होऊ लागला आहे. त्यात उन्हाळा अधिकच कडक होत असल्याने इंदापूर तालुक्यातील उजनीतलगतचा शेतकरी हवालदिल झाला आहे.

# खेडमधील प्रशासकराज कधी संपणार?, विकासकामे रखडल्याने समस्यांचा डोंगर वाढता वाढे

## नगरपरिषद, जिल्हा परिषदेवर प्रशासकराज कायम असून निवडणुकीचा बिगुल कधी वाजणार असा सवाल उपस्थित केला जात आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार अधिक पारदर्शी आणि गतिमान व्हावा, यासाठी शासनाने जनतेतून निवडणूक घेऊन लोकप्रतिनिधी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषदेत पाठविते. दर पाच वर्षांनी निवडणूक घेण्यामागचा मुख्य हेतू सत्तेचे विकेंद्रीकरण होता. मात्र डिसेंबर 2021 मध्ये कार्यकाळ संपलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका (राजगुरूनगर, चाकण नगरारिषद सोडून यांचा कार्यकाल संपून पाच वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला आहे) चार वर्षे उलटत असतानाही जाहीर झालेल्या नाही. त्यामुळे नगरपरिषद, जिल्हा परिषदेवर प्रशासकराज कायम असून निवडणुकीचा बिगुल कधी वाजणार असा सवाल उपस्थित केला जात आहे.



शहराच्या विकासासाठी स्थानिक स्वराज्य संस्था अर्थात नगरपरिषद महत्त्वाची दुवा मानली जाते. राजगुरूनगर, चाकण नगरपरिषदेतील पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ 2019च्या दरम्यानच संपला. तसेच आळंदी नगरपरिषद जिल्हा परिषद व पंचायत समिती पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ मार्च 2021मध्येच संपलेला आहे. त्यावेळी महाविकास आघाडी सरकार राज्यात विराजमान होते. करोना, पावसाळा आदी कारणांमुळे निवडणूक वेळेत घेणे शक्य नसल्याने नगरपालिका बरखास्त करून प्रशासक नेमण्यात आले. खेड तालुक्यातील तिनही नगरपरिषदांवर मुख्याधिकारी यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली, प्रशासक नेमलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक किमान सहा महिन्यांत होणे अपेक्षित आहे. मात्र प्रभाग रचना, वॉर्ड फॉरमेशन, आरक्षण आदी प्रक्रिया पूर्ण होऊनही निवडणुका जाहीर झाल्या नाही.

पालिकांच्या निवडणुका जाहीर होत नसतानाच राज्यात जून-जुलैदरम्यान मोठा राजकीय भूकंप झाला. शिवसेनेत मोठी बंडखोरी होऊन महाविकास आघाडीचे सरकार पायउतार झाले. शिवसेनेचे एकनाथ शिंदे राज्याचे मुख्यमंत्री तर भाजपचे देवेंद्र फडणवीस, राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार उपमुख्यमंत्री झाले होते; नव सरकार स्थापन होऊन अडीच वर्षांचा कालावधी पूर्ण होऊन लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका झाल्या. मात्र अद्यापही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगूल वाजला नसल्याने विकासकामे रखडली असून समस्यांचा डोंगर वाढतच असल्याने नागरिक हैराण झाले आहेत.

### इच्छुकांची धावपळ थांबली

» राज्यात नोव्हेंबर 2024मध्ये महायुतीचे सरकार स्थापन झाले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी डिसेंबर 2024मध्ये स्वीकारून तीन महिने उलटले तरी अद्यापही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची घोषणा झालेली नाही. कारण जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषदांचा कार्यकाळ संपल्यानंतर इच्छुक उमेदवारांनी आपापल्या प्रभागांमध्ये जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली; मात्र अनेक वर्षे उलटत असतानाही प्रशासकराज कायम असल्याने इच्छुकांचीही धावपळ थांबली असून शहरांसह गावागावांत समस्यांचे डोंगर उभे राहत राहिले असून ते कधी सुटणार असा प्रश्न पुढे येत आहे.